Research Papers

# मादगी मेहतर समाजाचे लोकजीवन व लोकसंस्कृती

प्रा. डॉ.इ.जा. तांबोळी
प्रमुख मराठी विभाग
एस.एस.ए. आर्टस्अॅन्ड कॉमर्स कॉलेज
सोलापूर

## प्रस्तावना :—

वेगवेगळया परिसरातील आदिवासींचे जीवनचरित्र पुढे येत आहे . त्यांचे धार्मिक सामाजिक जीवन जेवण्या-राहण्याच्या पध्दती आणि नीतीमूल्ये कशी उत्क्रांत झालेली आहेत याचा शोध घेतला जात आहे . मादगी मेहतर समाज हा **1920** पासून महाराष्ट्रात पोट भरण्यासाठी आंध्र व कर्नाटक या राज्यातून आला . साधारणपणे आंध्र व कर्नाटक या राज्यात हा समाज भटक्या - आदीवासी अवस्थेत होता . रानावनात राहणारा शेती कसणारा कातडी कमविण्याचा व्यवसाय करणारा मादगी समाज आंध्रात पडलेल्या प्रचंड दुष्काळामुळे तो वाट मिळेल तिकडे स्थलांतरित झाला . आज सोलापूर कोल्हापूर सांगली सातारा पुणे उस्मानाबाद इत्यादी जिल्ह्यात तो स्थिरावला . जीवन जगण्यासाठी त्यांना भंगी व्हावे लागले . सफाईचे काम त्यांनी स्वीकारले . स्वातंञ्यही मिळाले . त्यानंतरही त्यांच्यात थोडासा बदल झाला असेल मात्र कामाची पध्दत बदललेली नाही . आजही तो मिळेल तेथे सफाईचे काम करून आपल्या जीवनाची वाट सुकर करीत आहे . त्या समाजाच्या रूढी व परंपरा कोणत्या? श्रध्दा व संकेत कसे आहेत? जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन कोणता? पारंपारिक सर्ण समारंभात म्हंटली जाणारी गाणी कोणती? इत्यादी प्रश्नांचा परामर्श शोधनिबंधात घेतलेला आहे .

लोकसाहित्य हे पिढयान-पिढया मौखिक परंपरेने प्रवाहित झालेले असते . त्यात सहजस्फूर्तता असते . ती कोणत्या व्यक्तिची निर्मिती नसून समूहमनाचा तो स्वच्छंद मोकळ आविष्कार असतो . त्यामुळे त्यात ताजेपणा दिसून येतो . असेच कांही संचित मादगी मेहतर समाजाच्या अंतरंगात शोधावयाचे आहे . महाराष्ट्रात शासनाने या समाजाका अनुसूचित जाती या प्रवर्गात समाविष्ट केलेले आहे . **1960** नंतर संस्कृतिक व सामाजिक उलथापाथी झाल्या . नव्या जाणीवा पुढे आल्या . **1**

मादगी समाजाचे लोकजीवन ः

महाराष्ट्रातील सोलापूर सातारा कोल्हापूर सांगली पुणे इत्यादी कांही जिळह्यात हा समाज विस्थापित झालेला दिसून येतो . हा सफाई कामगार म्हणून आज ओळखला जातो . भारतात रूखी वालमिकी डोर्मडुमार सुदर्शन लालबेगी मेघवाल किंवा मखियार इत्यादी नावाने तो ओळखला जातो . हा समाज आजच्या सर्वर्चसामाजिक शैक्षणिक राजकीय अशा क्षेत्रातून खूप दूर आहे . गावाच्या किंवा शहराच्या बाहेर यांच्या वस्त्या आढळतात . आज दळणवळणाच्या झपाटयात कांहीनी शहरात बहरलेल्या वातावरणात वस्ती केलेली आहे .

आंध्र व कर्नाटकातून हे लोक आले . येताना आपली एक संस्कृती घेऊन आले . आजही आपल्या परंपरा ते जपून आहेत . आजही त्यांचे आपल्या मूळगावी असलेल्या गावाकडे काही निमित्ताने येर्णेजाणे आहे . आज अतिशय दारिद्रय अवस्थेत हा समाज आपले जीवन जगत आहे . अशाही स्थितीत आनंदाने जगण्याची किमयादेखील साधलेली आहे .

अशा दुर्लक्षित समाजाची धर्मसंस्कृती त्यांची कला आर्थिक प्रश्न रूढी परंपरा जाती व्यवस्थेतील श्रमविभाजन आर्थिक शोषण सामाजिक शोषण सण देर्व देवता त्याची समृध्द अशी बोलीभाषा हे सारे अपरूप आहे .

रूढी व परंपरा ः

मादगी मेहतर समाज पारंपरिक मेलेल्या जनावराचे कातडे कमवून चप्पल तयार करण्याचे काम आंध्रात करीत होता . प्रचंड दुष्काळाच्या चटक्याने तो महाराष्ट्रात स्थिरावला . महाराष्ट्रात येताना आपली बालीभाषा व समृत्रद अशी संस्कृती घेऊन आला . आजही आपल्या रूढीपरंपरेशी तो एकनिष्ठ आहे . असे दिसून येते . पोशम्मा देवी हे त्यांचे दैवत आहे . देवीच्या भोवताली आपल्या र्गाहाणी मनातल्या नवर्ससायास ते सांगतात . नवसाची पूर्तीही ते करतात . आंध्रात हे लोक जंगलात थोडी भातशेतीही करीत होते . स्थलांतराने त्यांच्या जीवनात पोट भरण्यासाठी झाडू हेच साधन व शस्त्र बनले . आपल्या मुलांना आजार होऊनये तो सुखरूप राहावा . त्याची वाढ व्यवस्थित व्हावी . अशा भावनेने हा समाज पोशम्मा हा सण साजरा करतो . हिंदू धर्मातील सणाशी तो एकरूप झालेला दिसून येतो .

व्यवसाय ः

पूर्वीपासून जनावरे ओढणे कातडी कमाविणे मेलेल्या जनावरांची हाडे गोळ करून ठेवणे हा व्यवसाय स्थलांतराने लोप पावला . आज हा समाज सार्व जनिक मुतारी संडास स्वच्छ करणे महानगरपालिका नगरपालिका अशा शासकीय संस्थामध्ये कायम व हंगामी स्वरूपात सफाईतून मिळर्णाया रोजगारातून आपल्या रोर्जीरोटीचा प्रश्न त्याने सोडविलेला आहे . या समाजातील तरूण मुले खाजगी निमसरकारी संस्थामधून सफाईचे काम करीत आहेत . समाजातील कांही लोकानांच शासकीय निवारा मिळालेला आहे .

पेहराव ः

डोक्यावर टोपी हापचुड्डी अंगात बंडी पायात चप्पल असा त्यांचा पेहराव आहे . हातात बादली व खराटा असा हा महात्मा गांधीच्या तत्त्वाला संत गाडगे बाबांच्या अभियानाला वाहून घेतल्यासारखा वाटतो .

आहार ः

आहारात दोनही वेळेला भाताचा वापर ते करतात. चपाती भाकरी क्वचितच ते करतात. चिंचेची चटणी आंबाडयाची भाजी हे त्यांच्या जेवणातले विशेष पदार्थ आहेत. मेलेल्या जनावरांचे मटन हे लोक खातात. मेलेल्या जनावरांचे कपडे वाळवितो तसे वाळवितो. हे वाळलेले मटन मोठया चवीने व आनंदाने सारे कुटुंब खातो. तांदूळ व गव्हाच्या पिठाने आंबील हा पदार्थ तयार करतात. हा पातळ पदार्थ गाडग्यामध्ये भरून ठेवतात. लहार्नथोर सर्वच हा पदार्थ पितात.

सर्णसमारंभ साजरे करताना हे लोक त्यादिवशी दारू पितात शिंदी पितात स्र्त्रीपुरूष मुर्ले मुली सर्वच कुटुंब दारू शिंदी प्राशन करतो. दारू व मेहतर समाज याचे नाते अतूट आहे. हे त्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती मिळत नाही.

विवाह प्रथा ः

मादगी समाजात स्त्री व पुरूष यांना विवाहाचे बंधन पाळणे अनिवार्य आहे. या समाजात पितृसत्ताक कुटुंब पध्दती आहे. पाळण्याला बाशिंग बांधून लग्ने व्हायची. काळानुसार ते थांबले आहे. प्रीतीविवाह समाजाने लावलेले लग्न तरूणीच्या हातातील बांगडी काढून घेऊन झालेले लग्न अशाप्रकारे लग्ने होतात. आज मात्र या सर्व प्रथा कांही ठिकाणी दिसून येतात.

श्रध्दा व संकेत ः

मानव जीवन जगताना आपल्या मनात अनेक संकेत व श्रध्दा बागळून आहे. प्रत्येकाच्या कल्पना नि संकल्पना भिन्न आहेत. आजही वेगवेगळया धर्मा त अनेक विविध रूढी परंपरा नि श्रध्दा दिसून येतात. आपल्या मनातल्या गर्ा हाणी मादगी समाज देवी समोर मांडतो. या गर्ाहाणी पूर्ण होण्यासाठी एक बैल देवीच्या नावावर सोडला जातो. एका वर्षानें त्या बैलाचा बळी दिला जातो. हे मांस सर्वजण वाटून घेतात. कर्धीकधी हे मांस घेण्यासाठी संघर्ष होतात. मांस परगावात राहर्णाया मादगी समाजाला द्यायचे नाही असा रिवाज आहे.

शुभकामाला जाण्यासाठी किंवा या कार्याचा शुभारंभ करण्यासाठी मादगी समाजात फक्त दही पिऊन जायचे असा छोटासा विधी आहे. रस्त्यात जात असताना डोक्याला कावळा शिवला की स्नान करणे मांजर आडवे आले की त्या दिवशी ते काम करायचे नाही. अशा श्रध्दा आजही त्या समाजांनी जपलेल्या आहेत.

घरासमोरील झाडात जर घुबड येऊन बसला. ओरडू लागला की कोणाला तरी मृत्यु होणार असा संकेत रूढ आहे. रात्रीच्या समयी कुत्र्यांचे केकाटणे सुरू झाले तरी कोणाचा तरी अकाली मृत्यू होणार ॐ असा संकेत त्यांनी दृढ केलेला आहे. सहसा गावाच्या किंवा नगराच्या बाहेरच राहतात. "दुसरा चिनी प्रवासी युवानच्वांग सन 639 इ.स. मध्ये भारतात आला. तो 16 वर्षे राहिला. तो आपल्या प्रवासवर्णनात लिहितो ज्या वस्तीत आणि नगरात ते राहतात त्या नगरांच्या अथवा प्रदेशांच्या चारही भिंती उंच आणि रूंद आहेत. परंतु रस्ते अरूंद आणि वेडेवाकडे आहेत. दुकाने सडकेवर आहेत. घरे सडकेला लागून आहेत. खाटीक धोबी नट नर्तक आणि भंग्यांच्या स्त्रिया एका निश्चित चिन्हाद्वारे अलग केले गेले आहेत. शहराच्या बाहेर राहण्यासाठी भाग पाडले आहे" अशा प्रकारचे निरीक्षण चिनी प्रवाशाने लिहिले आहे. त्या काळातही ही प्रथा रूढ होती.

सण-समारंभ ः

माणूस जीवन जगताना जुने सोडून नवे स्वीकारतो. प्रगती साधत प्रवास सुरू केला. आपल्या जीवनात परंपरेने चालत आलेले सण रूढी विधी समजुती घेऊन तो जगू लागला. आपल्या देशात साजरे होणारे विविध जत्रा सण उत्सव नेहमीच औत्स्युकपुर्ण असतात. मादगी समाजाच्या जीवनावर हिंदूद्वार्मा तील सणांचा प्रभाव दिसून येतो. सण समारंभात विविधता दिसत असली तरी मानवाचे भावविश्र्व व श्रध्दाविश्र्व एकच आहे असे दिसून येते. मादर्गीमेहतर समाजात साजरे होणारे पारंपारिक सर्णसमारंभाचा आढावा खालीलप्रमार्णे

1) होळी ः

होळी हा सण अतिशय आनंदाचा नि आस्वादाचा आहे. या सणाला अतिशय महत्व आहे. या सणातच अनेक मुर्लामुलींचे विवाह निश्चित केले जातात. या सणात अतिशय आनंद लुटतात. सारे भावविश्र्वच विविध रंगाने रंगून जाते. होळीच्या दिवशी अनेक गीते गायली जातात.

'होलीरी रंग होली रंग होली'
चमकीले होली
'याडादी वक्कदिनू होली रे
आनुंटी कामय्या तांद्रीग्य वच्चिनाडू'

या गीतातून होळी सणाविषयी मनात निर्माण झालेल्या भावना प्रकट होतात. होळी सण आलेला आहे. सण साजरा होत आहे. होळीचा सण चमकत आहे. होळी विविध रंग घेवून आलेली आहे. ही होळी आमची आहे. ती वर्षातून एका दिवसासाठी आमच्या खातर आलेली आहे. यादिवशी स्र्त्रीपुरूष दारू शिंदी पिऊन आनंदाने मदमस्त होतात. आमच्या ईच्छा पूर्ततेसाठी ही होळी आलेली आहे. अशा भावना या गीतातून प्रकट होतो.

2) नामकरण विधी ः

झन्मलेल्या मुलाचा नामकरण विधी हा समाज मोठया आनंदाने करताना दिसतो. या दिवशी 'घुर्गुया' हा पदार्थ सर्वांना खाऊ म्हणून वाटतात. 'घुर्गया' म्हणजे हुरडा खाल्यानंतर राहिलेल्या कणसातून वाळलेली ज्वारी शिजविली जाते. त्यालाच 'घुर्गया' असे म्हणतात. साधारणपणे स्त्रीया गाणे गातात. गाण्यातून

आपल्या भावनांना वाट मोकळी करून देतात.
लाली लाली ई . . . . .
लाली पाटलवाडा राम गोविंदा
पुदुगज्जनलू पुली गोरूकबलू
पुतडू मिया अब्वा वचवू बच्वे

या गीतातून पाळण्यास रान आणि कृष्ण हे दोघे माझ्या मुलाच्या स्वरूपात पाळण्यात आलेले आहेत. वडिलाचा मुलगा आलेला आहे. या मुलामुळे एका व्यक्तित्वाला वडिताचा मान मिळालेला आहे. मोठा झाल्यानंतर 'अब्वा' असे हाक मारील. अशी भावना या गीतांतून प्रकट होते.

पाळणा सजवून अशा प्रकारची विविध गीते स्त्रीया फेर धरून गातात. एका वेगळया आनंदाचा ठेवा यातून निर्माण होतो.

3) लग्न ः

मानवी जीवनातला लग्न हा मंगल सोहळा ! दोन जीवांची मिलनगाठ. डोनाचे चार हात. णव्या स्वप्नांची निर्मिती आयुष्याला एक आगळं वेगळा वळण देणारा समारंभ. अशी एक भावना या समारंभात आहे.

पचन पचनी पंदीरल्ला किंदा
सोली सोलायटी निविलगाद निताला कुरलू

या गीतातून असा भाव प्रकट होतो की पानांचे मांडव घातलेले आहे. या मांडवाखाली सर्व आर्प्तइष्ट आलेले आहेत. सोळा पाटील सोळा चौधरी या समारंभाला आलेले आहेत. अशा मोठया व्यक्तिंच्या सान्धिध्यात हे लग्न संपन्न होत आहे. अशी भावना या गीतातून प्रकट होते.

4) जत्रा ः

दरवर्षी हे लोक जत्रा करतात. या जत्रेप्रसंगी अनेक गाणी स्र्त्रीपुरूष गातात. जत्रेतला आनंद द्विगुणीत करतात. या जत्रेत देवीला नैवेद्य दाखविला जातो. सारी वस्ती नटलेली असते. ही जत्रा तीन दिवस चालते.

अया येमन्ना कुरमय्या लेदना
तुरपु मंदला वतुरे कुरमण्णा निशावकू
तंदवटी मंदला पट्टीपूवासना

कुरमण्णा निशावकू वतुरे

या गीतातून बालाजी देवाच्या प्रती आपल्या मनात असलेली भक्तीची लाट प्रकट झालेली आहे . आम्ही तुझ्या दर्शनासाठी अतिशय भावूक आहोत . आम्हाला भक्तीतून तुझे दर्शन व्हावे असा विचार या लोक गीतातून प्रकट होतो .

5) पोशम्मादेवीचा सण ः

दरवर्षी पोशम्मा देवीचा सर्णउत्सव मोठया खुशीने हा समाज साजरा करतो . या देवीसमोर आपल्या लेकरांबाळांना कोणताही आजार येऊनये अशी मागणी देवीला करतात . या सणाच्या दिवशी गीतांना बहर येतो . प्रत्येक घराघरातून गाण्यांचा आवाज कानावर येतो .

अई अई यो जनलारा अम्मा पोशम्मा
केम कचिनारा
बोटू बोनस ते चिनारू आनंदा क्वचिनामू

हे पोशम्मा देवी तुझ्यासमोर आम्ही शरण आलो आहोत . मुझे स्वागत कुंकु हळद घेवून मोठया आनंदाने करीत आहोत . तुझे आगमन व्हावे अशी भावना या गीतातून प्रकट होते .

6) कोलांटल ः

हा टिप-यांचा खेळ आहे . मुले मुली टिर्पया घेवून गाणे गातात टिर्प या खेळतात . या खेळाला कोलांटल असे नाव आहे . दिवाळी दसरा अन्य आनंदाच्या क्षणी हा नाच सुरू होतो . संक्रांतीला ह्या खेळाचा मान आहे . आज तरी संक्रातीला कोलांटल साजरे केले जाते .

7) मयतविधू ः

मादगी समाजात मयताचे दफन करतात . दहन करीत नाहीत . मृत झाल्यावर प्रेमाला भिंतीला टेकून बसवितात . समोर पणती ठेवतात . त्याची पूजा करतात . सर्व नातेवाईकांनी अंत्तिम दश्रन घेतल्यानंतर त्याला चार खांदेकरी उचलतात . सुरूवातीला ज्यांनी खांदा दिलेला असतो त्यांनी शेवटी खांदा द्यायचा असतो . अशाप्रकारे स्मशान भूमीत त्याला दफन करतात .

कधी काळी गावाबाहेर इंग्रज सरकारनी या मादगी मेहतर समाजाला बांधून दिलेली 'भंग्याची चाळ' आजही आहे . याच चाळीत हे लोक आजही राहत आहेत . आंध्रातून व कर्नाटकातून घेऊन आलेल्या परंपर्ररूढी जपून आहेत . आज त्यांच्याही जीवनात बदल होत आहे . पांढर पेक्षा वर्गाशी राजकारणांशी सावरकारांशी संबंध येत आहे . त्यांचीही संघटना उभी झालेली आहे . जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदललेला आहे . त्याला गती नाही . आजही डबा आणि झाडू त्यांच्या हातात आहे .

मेहतर भंगी इत्यादी सफाई काम करर्णाया समाजाला सफाई कामगार शब्द वापरला जातो . समाजाच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे काम करणारा हा समाज अत्यंत उपेक्षित राहिला आहे . या समाजाच्या प्रश्नांकडे कोणाचे लक्ष गेले नाही . या समाजातील लोकसंस्कृती व लोकगीतांचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे .

निष्कर्ष ः

1 . मादगी मेहतर समाज हा आंध्र व कर्नाटकातून महाराष्ट्रात स्थिर झाला .

2 . स्थलांतरातून आपल्या वैशिष्टयासह जीवन जगत आहे . आपल्या भार्व भावना आपल्या बोलीभाषेतून तो प्रकट करतो .

3 . तेलगु व कन्नड भाषेतून आपली गीते साकारतो .

4 . या गीतात मराठी शब्द दिसून येतात .

उदा ः होळी अरे जन इत्यादी .

5 . मादगीमेहतर समाजाच्या बोली भाषेवर मराठीचा परिणाम झालेला आहे .

6 . महाराष्ट्रातल्या लोकजन कृषीजन संस्कृतीशी ते एकरूप झालेले आहेत .

7 . महाराष्ट्रातील आदीवासी ठाकरांचे लोकजीवनाशी रूढींपरंपरेत मादगीचे साम्य दिसून येते .

सामारोप ः

या शोधनिबंधात मादगी मेहतर समाजातील रूढींपरंपरा यांचा शोध घेतलेला आहे . त्यांचे सणवार कसे साजरे होतात व त्या दिवशी गायली जाणारी गीते यांचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे . हा शोधनिबंध म्हणजे फक्त एक स्वल्प विरामच आहे . संशोधनाचा आवाका खूप मोठा आहे . हे इथे नमूद करीत आहे . काही निष्कर्षाची मांडणीही केलेली आहे .

संदर्भ सूची ः


| लेखकांचे नांव | पुस्तक/प्रकाशन | पृष्ठ कमांक |
|---|---|---|
| 1 . डॉ . प्रमोद मुनघाटे | आदीवासीमराठी साहित्य<br>प्रतिमा प्रकाशन<br>पुणे – 2007 | 2 |
| 2 . युवान च्वॉग<br>(दुसरा चिनी प्रवासी) | अछूत कौन और कैसे<br>खंड - 7 | पृ . 106 |
| 3 . गाणी संकलन | अ) सौ . मंगम्मा व्यंकटेश देवनल्लू<br>ब) सौ . बालम्मा यलय्या मंडपू<br>क) सौ . इंदरम्मा चनय्या गुडशेलू | |